PlanetRead
Literacy for a Billion

Movie: Pinjara
Year: 1972

Song: Mala Lagali Kunachi Uchki
Lyricist: Jagdish Khebudkar

आता...
आता गं बया...
काय झालं
अगं हो हो हो हो हो...
अशी कुठं चालली ही पंजाब मेल
गचकं खात खात आं...

आली आली सुगी
म्हणून चालले बिगी बिगी
गोष्ट न्हाई सांगण्याजोगी
गोष्ट न्हाई सांगण्याजोगी
कुणी गालावर मारली टिचकी
मला लागली कुणाची उचकी
अहो मला लागली कुणाची उचकी
कुणाची गं कुणाची
ह्याची का त्याची
लाजू नको
लाजू नको
लाजू नको
मला लागली कुणाची उचकी

तरणीताठी नार शेलाटी
चढले मी बांधावर
तरणीताठी नार शेलाटी
चढले मी बांधावर
अटकर बांधा
गोरा गोरा खांदा
पदर वाऱ्यावर
फडामध्ये चाहुल
वाजलं त्याचं पाऊल
माझ्या उरात भरली धडकी
मला लागली कुणाची उचकी
अहो मला लागली कुणाची उचकी
कुणाची गं कुणाची
ह्याची का त्याची
लाजू नको
लाजू नको
लाजू नको
मला लागली कुणाची उचकी

उठून सकाळी
लई येरवाळी
गेले पानोठ्यावरी
उठून सकाळी
लई येरवाळी
गेले पानोठ्यावरी
उन्हात बसले न्हात
अंगाला पाणी गुदगुल्या करी
पाण्यामध्ये दिसं
त्याचं लागलं मला पिसं
त्यानं माझीच घेतली फिरकी
मला लागली कुणाची उचकी
अहो मला लागली कुणाची उचकी
कुणाची गं कुणाची
ह्याची का त्याची
लाजू नको
लाजू नको
लाजू नको

PlanetRead
Literacy for a Billion

मला लागली कुणाची उचकी
रात दिस जागते
वाट त्याची बघते
किती मी घालू साद
रात दिस जागते
वाट त्याची बघते
किती मी घालू साद
झोप माझी उडली
जादू कशी घडली
जाई ना त्याची याद
भेटीसाठी आले मनी

कासाविस झाले मी
मलाच झाले परकी
मला लागली कुणाची उचकी
अहो मला लागली कुणाची उचकी
कुणाची गं कुणाची
कुणाची गं कुणाची
ह्याची का त्याची
लाजू नको
लाजू नको
लाजू नको
मला लागली कुणाची

*Disclaimer: PlanetRead does not own these lyrics and is not using them for any commercial purpose. For over 20 years, PlanetRead has been subtitling Bollywood songs for mass literacy. These lyrics are being offered as part of PlanetRead's literacy development initiative.*

*PlanetRead is a tax-exempt, not-for-profit: 501(c) (3) in the United States and 80(G) in India.*